
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२३ जुलै २०२५




## परिणाम होईल खास, कामे सांगा पाच! भाजपचा नवा फॉर्म्युला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** सत्ताधारी भारतीय जनता पक्षानं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. निवडणुकीत फायदा होईल, अशी आपापल्या मतदारसंघातील पाच कामं सुचवण्याच्या सूचना आमदारांना देण्यात आल्या आहेत. भाजपच्या आमदारांनी त्यांच्या मतदारसंघातील अशा कामांची यादी देण्याची सुरुवात केलेली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाला आमदार यादी देत आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या आठवड्याभरात राज्याच्या विविध भागांमधील भाजपच्या आमदारांच्या स्वतंत्र बैठका त्यांच्या शासकीय निवासस्थानी घेतल्या. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत पक्षाची रणनीती काय असावी, याबद्दल फडणवीस यांनी आमदारांची मतं जाणून घेतली. स्थानिक समीकरणांचा आढावादेखील यावेळी घेण्यात आला.

तुमच्या मतदारसंघातील सर्वोच्च प्राधान्यक्रमाची पाच कामं कोणती, त्यांची यादी द्या, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीसांनी आमदारांना दिल्या. मुख्यमंत्री कार्यालयासह प्रदेश भाजप कार्यालयानंदेखील अशी कामं सुचवण्याच्या सूचना आमदारांना दिलेल्या होत्या. आमदारांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार आता त्यांच्या मतदारसंघातील कामं मार्गी लावली जाणार आहेत. लोकमतनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. व्यापक सार्वजनिक हिताचा विचार करुन कामं सुचवा. अनेक वर्षांपासून अडलेली कामं, ज्यामुळे मतदारसंघातील जनतेच्या समस्या मोठ्या प्रमाणात दूर होण्यास मदत होईल. अशी कामं जी झाल्यानं लोकांच्या मनात सरकारबद्दल चांगला संदेश जाईल, ती सुचवण्यास सांगण्यात आलं आहे. मतदारसंघात सरकारबद्दल सकारात्मक संदेश जाईल, अशी कामं भविष्यातही सुचवा, असं आमदारांना सांगण्यात आलं आहे.

आमदारांच्या बैठका घेताना मुख्यमंत्र्यांनी त्यांना मोलाचा सल्ला दिला. माध्यमांशी जास्त बोलू नका, अशी ताकीद मुख्यमंत्र्यांनी दिली. ज्यांच्याकडे माध्यमांशी बोलण्याची जबाबदारी दिली आहे, ते बोलतील. तुम्ही मतदारसंघाकडे लक्ष द्या. तिथल्या समस्या सोडवण्यावर भर द्या. बोलल्यानं उगाच वाद निर्माण होतात, असं फडणवीस यांनी आमदारांना सांगितलं.

आठवडा, पंधरा दिवसातून एकदा काही तास वेळात वेळ काढून काही तास आमदारांसाठी द्या, अशी विनंती अनेक आमदारांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. त्याला देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.२२, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

१) सुरेश धर्मा कोळी व बाळकृष्ण धर्मा कोळी, घर नं.१३४४, सेक्टर - १४, दिवाळे गांव, नवी मुंबई, २) अशोक कोळी व इतर घर नं.१३५३, सेक्टर - १४, दिवाळे गांव, नवी मुंबई यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत एमआरटीपी कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, सहाय्यक अभियंता आत्माराम काळे तसेच बेलापूर विभागातील अधिकारी/ कर्मचारी, मजूर, हॅमर, गॅसकटर तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा !



**दि.२२, मुंबई :** भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० पासून ते २४ जुलै २०२५ रात्रौ ८.३० पर्यंत ३.६ ते ४.३ मीटर तसेच पालघर आणि रायगड जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २४ जुलै २०२५ रोजीचे रात्रौ ८.३० पर्यंत ३.४ ते ३.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

**रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह सातारा घाट, कोल्हापूर घाट भागात ऑरेंज अलर्ट**

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असल्याने जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात ११७.८ मी.मी. पाऊस झाला. या पावसामुळे मौजे हदगाव नखाते, येथील सात ते आठ नागरिक पुराच्या पाण्यात घराच्या छतावर अडकले असता आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने त्यांना सुखरूप बाहेर काढले आहे. तसेच बाधित नागरिकांना सुखरूप स्थळी हलविण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

अतिवृष्टीमुळे हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मौजे बरडा येथे तीन व्यक्ती मंदिरात पुरामुळे अडकले असता स्थानिक बचाव पथकामार्फत सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून येथील परिस्थिती नियंत्रणात असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## श्री संत संतश्रेष्ठ नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्याची सांगता

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.२२, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील श्री संत शिरोमणी नामदेव महाराज समाज बांधवांनकडून, श्री नामदेव महाराज यांची ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला होता. दि.२२ मंगळवार रोजी पहाटे ५:०० वा. श्री संत नामदेव महाराजांच्या मूर्तीवर शोडोशोपचारे महा अभिषेक शिंपी समाजाचे अध्यक्ष किरण नवले यांच्या हस्ते सहपत्नीक करण्यात आला.

नंतर काकड - आरती, भजन व अल्पोहार आणि ११:०० वा.ह.भ.प.गिताबाई थोरात कदम यांचे सुश्राव्य, दणदणीत काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर विंचूर ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला व सायंकाळी ५:०० वा. संपूर्ण गावातून भक्तीमय वातावरणात दिंडीचे आयोजन करण्यात आले. त्यात विशेषतः स्त्रियांनी विशेष भाग घेऊन रिंगण पद्धतीने अभंगाच्या तालावर ठेका धरला. यावेळी संपूर्ण शिंपी समाज बांधव महिला व पुरुष आणि युवक वर्ग, आबालृद्ध यांनी मोठ्या उत्साहात आपला सहभाग नोंदवला.

## मुंब्र्यात पालिका कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाच दिवस कचरा पडून

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, मुंब्रा (ठाणे) :** मुंब्र्यात कचऱ्यामुळे वाद निर्माण झाला आहे. पावसाचे दिवस त्यात कचऱ्याच्या समस्येवर पालिका ठोस पाऊलं उचलत नसल्याने नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया पाहायला मिळत आहे. मुंब्रा, कौसा येथील कचरासमस्येने आता उग्र रूप धारण करू लागली आहे. गेल्या पाच दिवसांपासून कचरा उचलला न गेल्याने संतप्त झालेल्या शानू पठाण यांनी कचर्याने भरलेल्या पाच गाड्या थेट ठाणे महानगर पालिका मुख्यालयाच्या दिशेने वळविल्या. मात्र, पोलिसांनी त्यांना मुंब्रा पोलीस ठाण्यासमोरच अडवून ताब्यात घेतले. गेल्या काही दिवसांपासून मुंब्र्यात कचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे.



डम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था करण्यात ठाणे पालिकेला यश येत नसल्याने येथील कचराच उचलला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. शहरातील कचरा उचलावा, यासाठी अनेकवेळा संबधितांना सांगूनही कार्यवाही होत नसल्याने संतापलेल्या शानू पठाण यांनी नाक्यानाक्यावर कचरा भरून गाड्या ठामपाच्या दिशेने वळविल्या. या गाड्या ते ठामपा मुख्यालयासमोर रिकाम्या करणार होते. कौसा, अमृत नगर, रशीद कंपाउंड आदी भागातील कचरा त्यांनी मुख्यालयासमोर फेकण्याचा निर्धार केला होता. मात्र, पोलिसांनी गाड्या अडवून त्यांना ताब्यात घेतले.

गेले काही दिवस ठाणे महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनात अनेक त्रुटी दिसून येत आहेत. डम्पिंग ग्राउंडची अनुपलब्धता असल्याने गेल्या कित्येक दिवसांपासून दिवा येथील कचऱ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. दिवा येथील डम्पिंग ग्राउंड बंद करण्यात आले असले तरी, तिथे साचून ठेवलेला कचऱ्याचा डोंगर अद्यापही जागच्या जागी आहे, ज्यामुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात हानी पोहोचत आहे. उच्च न्यायालयाने ठाणे महापालिकेला १० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे .

दरम्यान भिवंडीतील आतकोली येथे ३४ हेक्टर क्षेत्रावर नवीन डम्पिंग ग्राउंड सुरू करण्यात आले आहे. मात्र, ठाण्यातील मुल्लाबाग बस डेपो परिसरातही कचरा टाकण्यास सुरुवात झाल्यामुळे स्थानिक नागरिकांनी विरोध केला. रहिवासी भागात डम्पिंग ग्राउंड सुरू केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

मुंब्रा-कौसा परिसरात कचरा समस्या फक्त एक कचरा साठा नाही, तर हे पर्यावरणासाठी आणि लोकांच्या आरोग्यासाठी धोका उत्पन्न करणारे यंत्र बनले आहे. गाड्यांवर निदर्शने करून सरकारी अधिकारी, स्थानिक पोलीस, आणि नागरिक यांच्यातील संघर्षात उच्च न्यायालयाची दखल आणि दंड इतकंच पुरेसे नाही; तातडीने दीर्घकालीन आणि पर्यावरणपूरक उपाययोजना आखणे आवश्यक आहे, असं मत नागरिकांनी व्यक्त केलं आहे.

## गडचिरोली देशातील सर्वाधिक हरित जिल्हा बनविण्याचा मुख्यमंत्री यांचा संकल्प

### एक कोटी वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, गडचिरोली :** राज्यात सर्वाधिक वनाच्छादित अशा गडचिरोली जिल्ह्याची ओळख 'महाराष्ट्राचे फुफ्फुस' म्हणून आहेच, परंतु आता हा जिल्हा देशातील सर्वाधिक हरित व वनाच्छादित जिल्हा बनविण्याचा संकल्प मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, वन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार रामदास मसराम, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, मुख्य वनसंरक्षक रमेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, उपवनसंरक्षक श्रीमती आर्या आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१४ ते २०१९ या काळात राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वी झाली होती, ज्याचा सकारात्मक परिणाम केंद्र सरकारच्या अहवालात नमूद आहे. याच अनुभवाच्या जोरावर आता ११ कोटी वृक्ष लागवडीपासून पुढे २५ कोटी वृक्ष लागवडीपर्यंतचा टप्पा राज्य सरकारने निश्चित केला असून, त्या दिशेने पावले टाकली जात आहेत. महाराष्ट्राचे वनसंतुलन गडचिरोलीमुळेच राखले गेल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

गडचिरोलीच्या या जल, जंगल, जमीन समृद्ध नैसर्गिक संपदेचे संतुलन राखून औद्योगिक आणि पर्यावरणपूरक विकास साधायचा असल्याचा पुनरुच्चार करत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, यावर्षी गडचिरोलीत ४० लाख आणि पुढील वर्षी ६० लाख झाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे 'कोट्यधीश' वृक्षसंख्येचा मान मिळवणारा गडचिरोली हा देशातील पहिला जिल्हा ठरणार आहे. नियमित वृक्षारोपणासाठी येथेच नर्सरीदेखील विकसित करण्यात येत आहे. यासोबतच येथील लॉईड्स व जेएसडब्ल्यु या दोन उद्योगांना प्रत्येकी २५ -२५ लाख वृक्षरोपणाचे स्वतंत्र उद्दिष्ट देवून हरित गडचिरोलीत सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.




वृक्ष लागवडीनंतर त्यांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे असल्याने या रोपांची पुढील एक वर्ष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देखरेख केली जाणार आहे. तसेच, वनाच्छादनवाढीचा मासिक, सहामाही आणि वार्षिक अहवाल घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अतिदुर्गम भागातील जिमलगट्टा आणि देचलीपेठा या पोलीस ठाण्यांच्या नवीन प्रशासकीय इमारतींचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यावेळी नक्षलग्रस्त भागातील पोलिस शहीदांच्या २३ पाल्यांना पोलिस दलात सामावून घेण्यात आले, त्यापैकी पंकज मेश्राम व मीना हेडो यांना प्रतिकात्मक स्वरूपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री यांच्याकडे सुपूर्द केला.

कार्यक्रमास महसूल, वन, कृषी विभाग तसेच अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## रेल्वेचा खरा विस्तार कधी?

मराठवाड्यातील आठही जिल्हे कित्येक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर थोड्याफार प्रमाणात का होईना रेल्वेसेवेच्या नकाशावर उमटले आहेत. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली हे जिल्हे रेल्वेने जोडले गेले होते. त्यांना मीटरगेजचे ब्रॉडगेज करण्यासाठी कित्येक दशकांचा लढा द्यावा लागला. मागच्या तीन दशकांत लातूर, धाराशिव आणि बीड या जिल्ह्यांत रेल्वे कशीबशी पोचली; पण मराठवाडाभर रेल्वे विस्ताराच्या योजनांची मोठ्या प्रमाणावर गरज आहे.

मराठवाड्यातील पाच जिल्हे 'दक्षिण मध्य रेल्वे'शी, तर तीन जिल्हे 'मध्य रेल्वे'शी जोडले गेले आहेत. त्यामुळे केंद्रात मागण्या मांडताना नेहमीच अडचण होते. गेल्या काही महिन्यांत 'दक्षिण मध्य'च्या नांदेड विभागातून तिरुपती, पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या. काही गाड्यांना मुदतवाढ देण्यात आली. परभणी-मनमाड मार्गावर सिकंदराबाद नगरसोल, नांदेड-फिरोजपूर गाड्या सुरू झाल्या. विशेष रेल्वेची घोषणा करताना त्या मार्गावरील प्रवासी संख्या, प्रतीक्षा यादी, महसूल याचाही विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा यांपैकी कोणतेही कारण सांगून रेल्वेसेवा बंद केली जाण्याची शक्यता उरते. यामुळे त्या भागावर अन्याय होतो. 'दक्षिण मध्य'कडून नांदेडहून बहुतांश रेल्वे सोडल्या जातात. त्यातून पाच जिल्ह्यांची कनेक्टिव्हिटी होते; पण धाराशिव, लातूर, बीड यांचा विचार केला जात नाही.

नांदेड -पनवेल गाडी पुण्याहून जाते. नांदेड-पुणे, परभणी-पुणे किंवा छत्रपती संभाजीनगर-पुणे असे मार्ग प्रायोगिक तत्त्वावर सुरू करायला हवेत; प्रवाशांचा प्रतिसाद पाहून नियमित गाडी सुरू करण्याबाबत विचार केला जाऊ शकतो. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई अशी जनशताब्दी एक्स्प्रेस मोठ्या मागणीनंतर सुरू करण्यात आली. कालांतराने तिचा हिंगोलीपर्यंत विस्तार करण्यात आला. 'वंदे भारत' मालिकेत जालना-मुंबई सेवा सुरू झाली. तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी यासाठी पुढाकार घेतला. आता ही गाडी नांदेड ते मुंबई धावणार आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई-लातूर रेल्वेचा विस्तार बिदरपर्यंत केला गेला. कुठलीही मागणी नसताना केवळ राजकीय हट्टापोटी हा निर्णय झाला. लातूरकरांनी आंदोलन केल्यानंतर तीन दिवस लातूर आणि तीन दिवस बिदर असे वेळापत्रक निश्चित झाले.

या तीन उदाहरणांवरून रेल्वेसेवेचा विस्तार झाला, असे म्हणता येईल. मात्र, विशेष वा नवीन रेल्वे सुरू करताना एखाद्या भागाकडे दुर्लक्ष करणे, लोकांच्या मागणीनुसार रेल्वे सुरू न करणे या गोष्टी पाहता प्रवाशांना सुविधांपासून दूर तर ठेवले जात नाही ना, याचा विचार होणेही महत्त्वाचे आहे. पूर्वी रेल्वेचा अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर केला जात होता. अकरा वर्षांपूर्वी मुख्य अर्थसंकल्पातच त्याचा समावेश केला गेला. त्यामुळे रेल्वेकडून काय मिळाले हे कळण्यास कित्येक दिवस उलटून जातात. पूर्वी प्रत्येक भागाला रेल्वेकडून प्रतिधिनित्व दिले जात होते. आता वेगळेच चित्र दिसते.

रेल्वे चालविण्याचा अधिकार त्या विभागाला, तसेच झोनला देण्यात आला आहे. यामुळे आता प्रत्येक रेल्वेसाठी स्थानिक रेल्वेच्या संघटनेला किंवा लोकप्रतिनिधींना सेवेतील सातत्य, सुधारणांसाठी अधिकाऱ्यांशी बोलावे लागते. तिथून काही प्रतिसाद न मिळाल्यास रेल्वेमंत्री किंवा रेल्वे बोर्डाचे अधिकारी यांना चर्चा करून सुविधा उपलब्ध करून घ्याव्या लागतात. दिल्लीदरबारी ज्याचे वजन जास्त ते लोकप्रतिनिधी आपल्या पदरात जास्त माप टाकून घेण्यात यशस्वी होतात; पण हे प्रत्येक लोकप्रतिनिधीला शक्य होईलच असे नाही. त्यामुळे अडचण मराठवाड्याचीच होत आहे. दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन मराठवाड्यातील मागण्यांकडे लक्ष देत नाही, असा आरोप रेल्वे प्रवासी संघटनांकडून केला जातो.

यामुळे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधील रेल्वेचे जाळे कधी विस्तारणार हा प्रश्न कायम आहे.

## सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे

सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो. सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते. सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे फेसबुक आणि इंस्टाग्राम वरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात. मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो



व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात . आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जातेतरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मीडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पद्धतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी. सोशल मीडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मीडियावर टाकू नये. सोशल मीडियावर वावरताना जर सतर्क राहिले नाही तर सायबर गुन्हेगारांचे हे अदृश्य चेहरे आपल्याला घेरण्यास टपून बसलेलेच आहेत याची जाणीव सोशल मीडिया वापरणाऱ्या सर्व तरूणांनी ठेवावी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## ७/११ चा बॉम्बस्फोट केला तरी कुणी ?

११ जुलै २००६ या दिवशी मुंबईतील पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकल ट्रेन्समध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या प्रकरणी पकडल्या गेलेल्या आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने केलेल्या निर्दोष सुटकेमुळे साऱ्या देशाला चक्रावून सोडले आहे. बॉम्बस्फोटानंतर मुंबई पोलिसांनी तपास करून १२ जणांच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले. पोलिसांनी सादर केलेले पुरावे आणि आरोपींनी दिलेल्या कबुलीजबाबाच्या आधारावर सत्र न्यायालयाने १२ आरोपींपैकी ५ जणांना फाशीची शिक्षा सुनावली तर अन्य आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. ज्या पुराव्याच्या आधारावर सत्र न्यायालयाने ही शिक्षा सुनावली होती तो पुरावाच उच्च न्यायालयाने अस्वीकार्य ठरवल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. त्यामुळे जनमानसांत संतापाची लाट उसळली आहे. ११ जुलै २००६ या गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी गर्दीच्या वेळी पश्चिम रेल्वेमार्गावरील वांद्रे ते भाईंदर रेल्वे स्थानकांदरम्यान सायंकाळी ६.२४ ते ६.३५ या ११ मिनिटांच्या काळात एकामागोमाग एक असे ७ लोकल गाड्यांमध्ये भीषण स्फोट झाले. १९९३ च्या बॉम्बस्फोटाप्रमाणे या स्फोटांसाठीही आरडीएक्सचा वापर करण्यात आला होता. हे स्फोट इतके भीषण होते कि रेल्वे डब्यांच्या चिंधड्या झाल्या. १८९ निष्पाप नागरिकांचा यामध्ये बळी गेला तर ८०० हुन अधिक घायाळ झाले होते. अनेकांचे संसार उध्वस्त झाले, अनेक जण पोरके झाले तर कितीतरी जण आयुष्यभरासाठी कायमचे जायबंदी झाले. ज्यांनी आपल्या घरातील माणूस गमावला त्यांची उणीव भरून येणारी नसली तरी सत्र न्यालयालयाच्या निकालाने त्यांना दिलासा नक्कीच मिळाला होता. आता मात्र उच्च न्यायालयाने सर्वच आरोपींना निर्दोष सोडल्याने दोष द्यायचा तरी कोणाला असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आमच्यावर टाकलेली जबाबदारी आम्ही पार पाडली, आरोपींचा विरोधात सरकारी पक्ष एकही आरोप सिद्ध करू शकला नाही, अशी टिपणी या निकालानंतर न्यायमूर्तींनी दिली आहे, यावरून आता अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सत्र न्यायालयाने दिलेला निकाल उच्च न्यायालय खोटा ठरवते तर कोणाचा निकाल खरा समजावा ? देशाच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या अत्यंत महत्वाच्या गुन्ह्याच्या बाबतीत पोलिसांनी त्यावेळी तपासात उणीव सोडली का ? पुरावे गहाळ करण्यात आले का ? त्यावेळी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का ? यामध्ये तत्कालीन सत्ताधारी पक्षावर कोणाचा दबाव होता का ? तपासात त्रुटी ठेवणाऱ्या तपास अधिकाऱ्यांची आता चौकशी होणार का ? आरोपी जर निर्दोष आहेत तर बॉम्बस्फोट तरी कोणी केले ? बॉम्बस्फोटात ज्यांचे नाहक बळी गेले त्यांच्या प्राणांना काहीच मोल नाही का ? बळी गेलेल्यांच्या नातेवाइकांना न्याय केव्हा मिळणार ? कि त्यांनी आयुष्यभर न्यायाची वाट पहात जीवन कंठायचे ? पैशाने न्याय विकत घेता येतो, न्यायाचा आवाज दाबता येतो असे चित्रपटांतून पाहिले होते, कथांतून वाचले होते. इथे तर दहशतवादी कृत्याच्या माध्यमातून देशाच्या सुरक्षा व्यवस्थेलाच आव्हान दिले गेले होते. आणि हे आव्हान तर आपल्याला पेलता नाहीच आले उलट आपल्याच नागरिकांना न्याय देण्यात आपण अपयशी ठरलो. सबळ पुरावे नाहीत म्हणून उच्च न्यायालयाने आरोपींना निर्दोष सोडले आहे; मात्र न्यायालयाचे याआधीचे निकाल पाहता निर्दोष सोडलेले अनेक आरोपी पुन्हा तशाच प्रकारच्या आरोपांमध्ये पकडले गेलेले आहेत. या निकालातून न्यायालयाने निर्दोष सोडलेल्या आरोपींच्या बाबतीतही असेच काही घडले तर ते देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ते किती घातक ठरू शकते याचा अंदाज आपण नक्कीच लावू शकतो.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## दिवा जळे...

पथ दिवे ते बिचारे
का दिवसभर जळे
सूर्य प्रकाश असता
रूप त्यांचे उजळे

बंद करावा स्वीच
कुणा काही न कळे
कुठे गुप्त वायरमन
तोंडा करून काळे

बोलत नाही कुणी
श्रीमुखा लावी टाळे
सुजाण नागरिक तो
फोन करून कंटाळे

उजेडात कसे उजेड
रे एकमेकांत मिसळे
कोण देतोयं प्रकाश
स्पर्धासूर्याशी उसळे

सूर्यअस्तास चालला
उघडेअंधाराचे जाळे
झोपडीत दूर एखादं
लुकलूक दीप उजळे

पथ दीप ते दमलेले
मिटूनि घेतात डोळे
रस्त्या घोर काळोख
ना दिसे खाच खळे

भीत भीत अंधारात
जीवन चालू बळबळे
बिना तक्रारी सोसतो
सुजाण आम्ही दुबळे

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक सूर्यास्त चालला बातमी

# माणूस फक्त माणूस म्हणून, का ओळखला जात नाही?

पृथ्वीवर वेगवेगळ्या प्राण्यांचे वास्तव्य आहे. जंगलात, शेतात, रान शिवारात आणि माणसांसोबत गावात आणि शहरात हे प्राणी राहतात. या प्राण्यांची जीवनशैली वेगवेगळी असते.या प्राण्यांचे एक खास वैशिष्ट्य असते. त्यावरून त्या प्राण्यांची ओळख होते. वाघ हा वाघ म्हणून, हत्ती हा हत्ती म्हणून, लांडगा हा लांडगा म्हणून, कोल्हा हा कोल्हा म्हणून आणि सिंह हा सिंह म्हणूनच ओळखले जातात. तसे माणूस हा माणूस म्हणून का ओळखला जात नाही? माणूस कधी लबाड लांडगा, कधी धूर्त कोल्हा, कधी रानटी डुक्कर तर कधी फुत्कार मारणारा विषारी नाग का असतो?एकट्या माणसाची अशै वेगवेगळी ओळख का होत असते?

जंगलातले हिंस्र प्राणी हे इतर सजीवांची शिकार करून आपल्या भोजनाची व्यवस्था करतात. ते गवत थोडेच खाणार आहेत?इतर रानटी जनावरांचा सुळसुळाट व त्यांचा कावेबाजपणा जंगलात सतत सुरू असतो. ते कधीच शांततेने व सभ्यतेने जीवन जगत नसतात. आपल्यापेक्षा कमी ताकदीचे आणि भित्रे प्राणी शोधायचे, त्यांची शिकार करायची आणि पोटाची भूक मिटवायची, असा त्यांचा नित्यक्रम ठरलेला असतो. माणूस नावाचा प्राणी सध्या असेच विचित्र वागत आहे. माणूस वाघाच्या, सिंहाच्या, लांडग्याच्या आणि इतर हिंस्र प्राण्यांच्या रुपात आला की तो भित्र्या, कमकुवत, गरीब माणसांची शिकार करायला टपलेला असतो. माणूस लबाड लांडगा बनून दुसऱ्यांची संपत्ती हडप करतो. माणूस धूर्त कोल्हा बनून इतर माणसांची फसवणूक करतो. माणूस



सैतान बनून अबला नारींच्या इज्जतीचे लचके तोडतो. माणूस दांडगट बनून नातेवाईकांची संपत्ती हडपण्याचे कपटी डाव खेळतो.

माणूस गोगलगाय बनून कोणाच्या तरी पोटात शिरतो. वेळप्रसंगी विषारी नाग बनून असा डसतो की पाणी सुध्दा मागू देत नाही. कधी माणूस मगर बनतो आणि सगळ्या गरीब जलचर प्राण्यांना गिळतो. माणूस मगरीसारखा हिंस्र बनून आपल्याच माणसांना मटकन गिळतो. माणूस चतूर परंतु कपटी कावळा बनून दुसऱ्यांच्या ताटातली भाकरी चटकन उचलतो आणि लांब जाऊन शांतपणे खात बसतो.

माणूस हा एकटा असा प्राणी आहे जो नेहमी इतर प्राणी बनून आपले वेगवेगळे वाईट दुर्गुण आणि मानसिक अवस्था दाखवतो. माणूस भ्रष्टाचार करतो,अफरातफर करतो,लाच घेतो. पैसाच पैसा कमावतो आणि वाईट मार्गाने कमावलेल्या पैशाचा गैरवापर करतो. आणि केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून देवदर्शन करायला जातो, कुंभमेळ्यात जाऊन डुबकी मारून शुध्द होतो. हे कितपत योग्य आहे?खरेतर माणसाने एकानंतर एक वाईट कर्मांचा सपाटा सुरू केला आहे.

एकीकडे आपण 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' ही प्रार्थना अगदी आवडीने व एकाग्रतेने गातो.परंतु,ही प्रार्थना आपल्या आचरणात कुठेही दिसत नाही. आपण सगळे फक्त नावाला माणसे आहोत पण वागायला, बोलायला आणि व्यवहाराला मात्र हिंस्र प्राणी आहोत. सध्या जिकडे तिकडे भ्रष्टाचार बोकाळला आहे. लोकांची नितीमत्ता ढासळलेली आहे. प्रामाणिकपणे कष्ट करण्याची प्रवृत्ती संपली आहे. दुसऱ्यांची संपत्ती हडप करून श्रीमंत होण्याचा सपाटा सुरू आहे. एकट्या दुकट्या महिलांकडे वाईट नजरेने पाहणाऱ्या नजरा वाढल्या आहेत. रोज वर्तमानपत्रांत माणसांच्या हातून घडणाऱ्या कुकर्मांच्या बातम्या छापून येत आहेत. क्षुल्लक कारणांमुळे खून करण्यापर्यंत मजल जात आहे. मुलगा आणि वडील, मुलगा आणि आई, भाऊ आणि भाऊ, भाऊ आणि बहीण या पवित्र नात्यांमध्ये कटुता निर्माण झाली आहे. नात्यांमधील आपुलकी नष्ट झाली आहे. ही सगळी लक्षणे माणसांमध्ये पशुता आले असल्याचे आहेत. म्हणून माणूस हा माणूस असला तरीही तो हिंस्र प्राणी बनून जीवन जगत आहे. या कारणास्तव माणूस हा इतर प्राण्यांच्या नावाने ओळखला जात आहे. ही बाब भविष्यात आणखी धोकादायक ठरू शकते. त्यासाठी माणसाने फक्त माणूस बनून जगावे. आणि माणसाची ओळख फक्त माणूस म्हणून व्हावी हीच सदिच्छा!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९७३०९३९७३२.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# पानीवचे सुपुत्र जवान यशवंत बाबर यांना वीरमरण; आज लष्करी इतमामात अंत्यसंस्कार



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** पानीव गावाचे सुपुत्र व भारतीय लष्करातील जवान हवालदार यशवंत भानुदास बाबर, वय ५५ यांना रविवार, दिनांक २० जुलै २०२५ मध्यरात्री १ वाजता कोची (केरळ) येथे ड्युटीवर असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वीरमरण प्राप्त झाले. गेल्या ३५ वर्षांपासून भारतीय लष्करात सेवा बजावत असलेले यशवंत बाबर सध्या कोची येथील संरक्षण सुरक्षा दलात कार्यरत होते. देशसेवेच्या पवित्र कार्यात तन-मनाने समर्पित राहून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी अर्पण केले. त्यांच्या निधनामुळे पानीव गावासह संपूर्ण माळशिरस तालुक्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने गाव एक शूर, निष्ठावान आणि कर्तव्यदक्ष सैनिक गमावला आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा आप्तपरिवार आहे. बाबर कुटुंबावर या दुःखद घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मंगळवार, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी सकाळी कोची येथील लष्कराच्या मुख्य कार्यालयात त्यांना लष्करी मानवंदना दिल्यानंतर त्यांचे पार्थिव विमानाने पुणे येथे रात्री ९ वाजेपर्यंत पोहोचेल तिथून लष्करी वाहनाने मध्यरात्रीपर्यंत पानीव गावात दाखल होणार असून बुधवार, दिनांक २३ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता लष्करी इतमामात पानीव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पानीव ग्रामपंचायत प्रशासनाच्यावतीने याबाबतची सर्व व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रकाश पाटील यांनी दिली. हवालदार यशवंत बाबर यांच्या अतुलनीय सेवेबद्दल संपूर्ण गावकऱ्यांना अभिमान आहे. त्यांच्यावरील ही अपार दुःखद घटना सर्वांसाठी अत्यंत वेदनादायक आहे.


# आरोग्य केंद्रातील औषध पुरवठ्यावर ऑनलाईन देखरेख



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२२, ठाणे :** महापालिका आरोग्य विभागाने आरोग्य केंद्रातील औषध पुरवठ्याची चोख माहिती मिळविण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित केली आहे. औषधांचा तुटवडा होऊ नये. तसेच मुदत संपलेली औषधे वितरित होऊ नयेत. म्हणून यासाठी ही प्रणाली ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येत आहे. यामुळे औषधांची योग्य प्रकारे माहिती तात्काळ मिळाल्यामुळे ऑनलाईन देखरेखीचे काम जलद गतीने होण्याबाबतची स्थिती आहे. ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २६ लाखाच्या पुढे गेली आहे. त्यापैकी ५२ टक्के नागरिक झोपडी व चाळीमध्ये राहतात. सद्यस्थितीत ठाण्यात ३३ आरोग्य केंद्रे व ६ प्रसुती गृह असून यामाध्यमातून ठाणेकरांना मोफत उपचार मिळत आहेत. या ठिकाणी येणाऱ्या रूग्णांची संख्या फार मोठी असते. रुग्णांना पुरविली जाणारी औषधे पालिकेच्या आरोग्य विभागाकडून आरोग्य केंद्रांमध्ये येत असतात. आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे हा पुरवठा होत असतो. पुर्वीच्या ऑनलाईन पद्धतीमुळे औषधांचा तुटवडा, मुदत संपलेली औषधे वापरली जाणे या शक्यता लक्षात घेऊन ही नविन संगणकीय प्रणाली आणली असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी सांगितले.

# हॉटेल व्यवसायिकांना खंडणी मागणारा आर.टी.आय कार्यकर्ता अटक



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२२, कल्याण (ठाणे) :** खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर या कार्यालयाकडे एका हॉटेल व्यवसायीकाने तक्रारी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जामध्ये इसम नामे नितीन घोले हा कल्याण परिसरातील हॉटेल व्यवसायिकांविरूध्द खोटया तक्रारी करण्यांची धमकी देवुन खंडणीची मागणी करीत असल्याचे नमुद केले आहे.सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथील अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २१/०७/२०२५ रोजी संतोष हॉटेल, कल्याण पश्चिम याठिकाणी सापळ्याचे आयोजन करून यातील खंडणी मागणारा इसम नामे नितीन शांताराम घोले वय ४९ वर्षे, धंदा व्यवसाय रा. रूम नंबर १०३, शंकेश्वर प्रेसिडेन्सी बिल्डीग नंबर ०२, तावरीपाडा, आर. डी.ओ. च्या पाठीमागे, कल्याण पश्चिम यास खंडणीची रक्कम रु ५० हजार रू. स्विकारले असताना ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपी विरुध्द महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८४५/२०२५ बीएनएस कायदा कलम ३०८ (२), ३०८(३), ३०८(४), ३०८(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा आणखी एक साथीदार फरार असल्याने त्याचा शोध सुरू आहे. सदर आरोपी रिमांडकामी न्यायालयात हजर करण्यात आला असताना त्यास न्यायालयाने दिनांक २५/०७/२०२५ पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास खंडणी विरोधी पथक, ठाणे करीत आहे. सदर आरोपी हा स्वतः आरटीआय कार्यकर्ता असल्याचे व त्यात पोलीस व इतर शासकीय अधिकारी घाबरत असुन त्यास पैसे दिले नाही तर फिर्यादीस खोटया गुन्हयामध्ये अडकविण्याची धमकी देवून खंडणी मागत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याने अशाप्रकारे इतरही हॉटेल व्यवसायिकांकडुन खंडणी घेतली असल्याची शक्यता असुन तशी मागणी झाली असल्यास संबंधीतानी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे येथे सपोनि / गोरे यांचेशी मोबाईल क्रमांक ७५८८५२८७१४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे अवाहन करण्यात येत आहे. सदरची कारवाई डॉ.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), ठाणे शहर अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), ठाणे, विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-२, गुन्हे शाखा, ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी, सपोनि/कृष्णा गोरे, पोहवा/कानडे, शिंदे, चापोहवा/हिवरे, पोना / हासे, पोशि/ढाकणे यानी केली आहे.

# मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियान जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवा - पालकमंत्री सावे

## मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र विशेष मोहिमेचे पालकमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नांदेड :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून २२ जुलै ते २२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यात मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. हे अभियान जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवा, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. आज जिल्हा रुग्णालयात त्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र या विशेष मोहिमेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर आपनगिरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रोशना आरा तडवी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हनुमंत पाटील, डॉ. एच. साखरे, डॉ. गायकवाड तसेच सर्व नेत्र चिकित्सा अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.




या मोहिमेदरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्याकडून प्रत्यक्ष गृह भेट व रुग्णालयात येणाऱ्या ४० वर्षाच्या वरील नागरिकांची नेत्र तपासणी करून मोतीबिंदूच्या रुग्णांचा शोध घेण्यात येत आहे. या सर्व रुग्णांची जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. समाजातील एकही व्यक्ती मोतीबिंदू मुळे अंध होणार नाही याची खबरदारी घेवून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र या संकल्पनेला पूर्ण करण्याचे आवाहनही पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. याबाबत योग्य ती खबरदारी जिल्हा प्रशासन घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या अभियानासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अतिशय सूक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये आशा कार्यकर्ती, एमपीडब्लु, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालय यांच्या मार्फत मोतीबिंदूचे रुग्ण गाव, वस्ती, वाडी पातळीवरून शोधून, मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सोबतच जन्मतःच मोतीबिंदू असणाऱ्या बालकांचे शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत. म्हणून त्यासाठी लागणारे नव-नविन तंत्रज्ञान (फॅक्रो मशीन्स हे उच्च दर्जाची उपकरणे (सुक्ष्मदर्शक यंत्रणा), ए-स्कॅन बायोमीटर मशीन शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड मेघना कावली, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नांदेड डॉ.संगीता देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर आपनगिरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रोशना आरा तडवी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.हनुमंत पाटील, डॉ.एच.साखरे, डॉ.गायकवाड तसेच इतर सर्व नेत्र चिकित्सा अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# दिव्यांग लाभार्थ्यांना पालकमंत्री देसाई यांच्या हस्ते साहित्य वाटप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, सातारा :** सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत केंद्र शासनाच्या एडिप योजनेंतर्गत अलिम्को या शासन मान्य संस्था संचलित एस.आर.ट्रस्ट या संस्थेमार्फत सातारा जिल्हयातील अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांगांना कृत्रिम हात पाय व कॅलिपर्स देण्यासाठी ऑन द स्पॉट निःशुल्क तपासणी व साहित्य वाटप शिबीराचे आयोजन सर्व तालुक्यांमध्ये करण्यात आले आहे.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृह साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक तुषार दोशी, अतिरिक्त जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद,



समाज कल्याण अधिकारी विद्यानंद चल्लावार आदी उपस्थित होते.

यावेळी दिव्यांग लाभार्थ्यांनी साहित्य मोफत मिळाल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे आभार माणून शिबिराबाबत समाधान व्यक्त केले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले - राज्यपाल राधाकृष्णन

## महाराष्ट्र नायक कॉफी टेबल बुकचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांनी महाराष्ट्राला अल्पावधीत प्रगतीपथावर नेले, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या 'महाराष्ट्र नायक' या विशेष कॉफी टेबल बुकचे प्रकाशन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे हस्ते राजभवन येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची कॉफी टेबल बुकची निर्मितीची संकल्पना अभिनंदनीय असल्याचे ही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार कालिदास कोळंबकर,योगेश सागर, मंगेश चव्हाण, देवयानी फरांदे, अनुप अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात'जलयुक्त शिवार अभियान'योजना राबवण्यात आली. ज्यामुळे२२ हजारहून अधिक गावांमध्ये जलसुरक्षा प्राप्त झाली. तसेच नागपूर-मुंबई शहरांना जोडणारा 'समृद्धी महामार्ग' हा भविष्यकालीन दृष्टीकोन असलेला प्रकल्प साकारला गेला. महाराष्ट्राने सेवा हक्क कायदा लागू केला आहे. त्यामुळेच 'आपले सरकार' ही तक्रार निवारण प्रणाली आणि सेवा हक्क कायदा नागरिकांना शेकडो सेवा घरपोच देत आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, श्री.फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वाखाली, महाराष्ट्र २०१६ मध्ये देशात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करणारे राज्य ठरले. जे देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या जवळपास निम्मे होते. पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्राधान्यामुळे मुंबई मेट्रोचे विस्तार प्रकल्प, 'अटल सेतू'सागरी पूल,तसेच शासकीय-खासगी भागीदारीद्वारे शहरी व ग्रामीण विकासाला चालना मिळाली. राज्यात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने'ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियान'आणि दुर्बल घटकांसाठी सीएसआरअंतर्गत प्रभावी उपक्रम राबवण्यात आले. महाराष्ट्रात लवकरच



वाढवणमधील खोल समुद्रातील बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जपान सरकारच्या साहाय्याने सुरू असलेली बुलेट ट्रेन योजना हे तीन ऐतिहासिक प्रकल्प साकारले जाणार असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जपान,सिंगापूर,जर्मनी व अमेरिका येथे महत्त्वाच्या राजनैतिक भेटी दिल्या,ज्यातून तंत्रज्ञान,पायाभूत सुविधा व शाश्वत विकासात जागतिक भागीदारी निमर्ण झाली. त्यांच्या'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम - दावोस'मधील सहभागामुळे महाराष्ट्राला जागतिक व्यासपीठावर मान्यता मिळाली.

ज्यामुळे १५ लाख कोटी रुपयांहून अधिक सामंजस्य करार झाले. आणि१६लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीचा मार्ग मोकळा झाला. कधी काळी नक्षलवादग्रस्त गडचिरोली जिल्हाआज'स्टील डिस्ट्रिक्ट ऑफ इंडिया'म्हणून ओळखला जातो,या परिवर्तनाचे संपूर्ण श्रेय श्री. फडणवीस यांना जात असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राजकीय जीवनापलीकडे, श्री. फडणवीस एक मूल्यप्रिय, कुटुंबवत्सल, आध्यात्मिक आणि विचारशील व्यक्तिमत्त्व आहे. राज्यातील कोट्यवधी महिलांच्या जीवनात 'माझी लाडकी बहिण योजने'च्या माध्यमातून एक कोटींहून अधिक महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य दिले जात आहे. या योजनेमुळे महिलांना आर्थिक व सामाजिक बळकटी मिळत असून हा सन्मान, आत्म निर्भरतेचा आणि भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आदर्श ठरला आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसनिमित्त त्यांनाही शुभेच्छा दिल्या. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर म्हणाले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या कामाचा गौरव,त्यांच्यासोबतचे अनुभव,प्रभावशाली नेतृत्वाची ओळख या कॉफीटेबल बुकच्या माध्यमातून सामान्य जनतेला होईल. त्यांचा अनुभव, प्रवास सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम या पुस्तकाच्या माध्यमातून होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासाठी 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. महाराष्ट्रासाठी स्वप्न बघितले असून ते पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या सोबत तत्परतेने राहू, असे ॲड. नार्वेकर यांनी सांगितले.

# सर्जेराव मोरे यांचे आकस्मिक निधन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** मोरे गल्ली येथील समाज सेवा संघाचे हरहुन्नरी कलाकार सर्जेराव यशवंत मोरे वय- ४५ यांचे पाटण येथे आकस्मिक निधन झाले.



मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक व सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोरे यांचे सर्जेराव मोरे हे बंधू होत सर्जेराव मोरे यांच्या निधनाने समाज सेवा संघ व

मोरे गल्ली परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पुतणे असा परिवार आहे. रक्षा विसर्जन गुरवारी सकाळी ९.३० रोजी पाटण स्मशानभूमी येथे होणार आहे.

# धाराशिव शहराला वाली आहे का?

## नूतन प्राथमिक विद्यामंदिरासमोर नाले तुंबले विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२२, धाराशिव :** धाराशिव शहरातील नूतन प्राथमिक विद्यामंदिरासमोर दिनांक २१ जुलै २०२५ रोजी झालेल्या पावसामुळे पुन्हा एकदा नाले तुंबले आहेत. नाल्यांचे सांडपाणी थेट शाळेच्या प्रवेशद्वारासमोर रस्त्यावर आल्याने विद्यार्थ्यांचे व पालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लहानग्या विद्यार्थ्यांना डबक्यातून वाट काढत शाळेत जावे लागले. ही परिस्थिती बघून एकच प्रश्न उपस्थित होतो.

धाराशिव शहराला प्रशासन नावाचा वाली आहे की नाही?नगरपरिषदेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी हे सर्व फक्त उद्घाटनं, फीत कापणे आणि फोटोसेशन पुरते मर्यादित आहेत का? शाळेच्या दारातच नाल्याचे पाणी साचते आणि यांच्याकडून साधी नालेसफाईही वेळेवर होत नाही, ही लाजिरवाणी बाब आहे. या सांडपाण्यात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका स्पष्टपणे दिसून येतो. तरीसुद्धा पालिकेने कोणतीही तात्काळ कारवाई केली नाही हे अत्यंत गंभीर आहे.



या दुर्लक्षामुळे उद्या एखाद्या विद्यार्थ्याला काही त्रास झाला तर त्याला जबाबदार कोण?प्रशासन झोपलंय. नाला तुंबल्याची तक्रार वारंवार करून ही कोणी ऐकत नाही. शाळेच्या दारात पाणी साचून मुले बेजार झालीत. उद्या आमची मुलं आजारी पडली तरजबाबदारकोण ? असा पालकांचा संतप्त सवाल आहे.

# महेंद्र कोवले फ्रेंड्स क्लबकडून श्रमदानातून खड्डे बुजविण्याचे काम



## गडबोरी - वासेरा रस्त्यावर केली मलमपट्टी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, सिंदेवाही (चंद्रपूर) :** सार्वजनिक बांधकाम उपविभाग सिंदेवाही अंतर्गत येत असलेला वासेरा - गडबोरी - सिंदेवाही या १० किलोमीटरच्या रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झाली असून गडबोरी ते वासेरा या ३ किलोमीटरच्या रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले असल्याने अखेर महेंद्र कोवले फ्रेंड्स क्लब वासेरा यांनी श्रमदानातून खड्डे बुजविण्याचे काम केले असल्याने त्यांच्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. अलीकडे लोकसहभागातून श्रमदान ही व्याख्याच लुप्त होण्याच्या मार्गावर असून शारीरिक श्रम किंवा सार्वजनिक कामामध्ये श्रम देताना दिसत नाही. एखाद्या विशिष्ट ध्येयासाठी काही व्यक्ती एकत्र येऊन काम करण्याची वृत्ती संपुष्टात आली असताना वासेरा येथील महेंद्र कोवले फ्रेंड्स क्लबचे वतीने एक पाऊल पुढे टाकण्यात आले.

सिंदेवाही हा तालुक्याचा ठिकाणाला जोडणारा वासेरा - गडबोरी - रामाळा हा वर्दळीचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असल्याने याबाबत एक दैनिक ने बातमी प्रकाशित केली होती. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयाने सदर रस्त्यावर केवळ गिट्टी टाकून खड्डे बुजविण्याचे काम केले. मात्र गिट्टीवरून मोटारसायकल या सारखी वाहने जात असताना अनेकांच्या मोटारसायकली घसरून पडल्या आहेत. तर काहींच्या मोटारसायकली पंक्चर झाल्या आहेत.

याबाबत संबंधित विभागात गिट्टी वर मुरुम टाकण्यासाठी माहिती देऊन सुद्धा विभागाने मुरुम टाकले नाही. अखेर महेंद्र कोवले फ्रेंड्स क्लबचे अध्यक्ष सूरज कोडापे यांचे नेतृत्वात सदर खड्ड्यावर श्रमदानातून मुरुम टाकून पसरविण्यात आली आहे.

यासाठी फ्रेंड्स क्लबचे संचालक तथा महालक्ष्मी इंडस्ट्रीज गडबोरी चे संचालक वैभव लिखितराव उज्वावकर, फ्रेंड्स क्लबचे संचालक महेंद्र कोवले, रमेश मेडीवार, घनश्याम मेडीवार, आकाश रणदिवे, सागर कुंभरे, इत्यादी उपस्थित राहून आणि स्वतः श्रमदान करून मुरुम पसरविण्याचे काम केले आहे. त्यामुळे परिसरातून त्यांचे अभिनंदन केल्या जात आहे.

# जाधवर 'नर्सिंग इन्स्टिट्यूट'च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

## परिमल-प्रमोद चौधरी फाउंडेशनकडून २.५ लाखांहून अधिक रकमेच्या फेलोशिप

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२२, खडकवासला (पुणे) :** कै.उद्धवराव तुळशीराम जाधवर फाउंडेशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग मध्ये परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने २.५ लाखांहून अधिक रकमेच्या फेलोशिप्स पात्र आणि गुणवंत विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आल्या. फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये तृतीय वर्षातील पायल निकम व मोहिनी वाळुंज यांना प्रत्येकी ५२ हजार ५०० रुपये इतकी रक्कम देण्यात आली. तसेच द्वितीय वर्षातील साक्षी काकडे, विद्या चवरे आणि स्नेहल दळवी या तिघींना प्रत्येकी ५६ हजार रुपयांची फेलोशिप प्रदान करण्यात आली.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, या सर्व विद्यार्थिनी आपल्या मेहनतीने व गुणवत्तेने ही शिष्यवृत्ती मिळवली आहे. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील आत्मविश्वासाला आणि प्रेरणेला दिलेला हात आहे. ही फेलोशिप विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासाला गती देणार असून, आरोग्यसेवेत काम करण्याची त्यांची जिद्द व निर्धार अधिक बळकट करणारी ठरणार आहे. नर्सिंग क्षेत्रातील उद्याचे आरोग्यसेवक घडवण्यासाठी दिलेल्या पाठिंब्यासाठी परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशनचे विशेष आभार इन्स्टिट्यूट च्या वतीने मानण्यात आले.




# सुपा येथे मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२३, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत २०० हून अधिक जणांनी रक्तदान केले. सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शिबिराला पारनेरचे आमदार काशिनाथ दाते, भाजप जिल्हा अध्यक्ष दिलीप भालसिंग, भाजप महिला जिल्हाध्यक्ष अश्विनीताई थोरात, दत्ता नाना पवार, सागर मैड सरपंच मनोज मुंगसे, नगरसेवक युवराज पठारे, सरपंच लहू भालेकर, मंगलताई मगर सुनिल थोरात डॉ.अजय येणारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत अशा सामाजिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

> रक्तदान करणे खूप महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे गरजूंना जीवदान मिळू शकते. रक्त हा असा घटक आहे. जो कोणताही माणूस स्वतः बनवू शकत नाही आणि तो नैसर्गिकरित्याच तयार होतो. त्यामुळे रक्ताची गरज असलेल्या व्यक्तींसाठी रक्तदान करणे हा एक महत्वाचा उपाय आहे.
>
> **- राहुल पाटील शिंदे**



# जिल्हास्तरीय खुली निबंध लेखन स्पर्धा पारितोषिक प्रदान

**अक्षराज : वाळू धायगुडे**

**दि.२२, खंडाळा (सातारा) :** समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र यांचे वतीने राजमाता अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षा निमित्त राज्यस्तरीय खुली निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील सातारा जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मंगळवार, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

या समारंभासाठी प्रमुख अतिथी प्रा.डॉ.धनंजय भिसे,समरसता प्रांत मंडळ सदस्य यांनी अहिल्यादेवी:चरित्र आणि प्रेरणा या विषयावर सखोल मांडणी केली. अध्यक्षीय मनोगतातएल.बी. एस.कॉलेज चे प्राचार्य शेखर मोहिते यांनी अहिल्यादेवींचे दूरगामी कार्य यावर विवेचन केले.



विशेष उपस्थिती बाळासाहेब खरात आणि अमित कुलकर्णी यांनी विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय निबंध लेखन प्रथम पारितोषिक विजेते खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात कार्यरत प्रा.अमीर इनामदार मनोगत व्यक्त करताना म्हणाले, समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र वतीने घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत आम्ही लेखणीतून व्यक्त झालो,आमच्या अक्षरातून निर्माण झालेल्या लेखणीचा हा सन्मान आहे.

वर्तमानकाळातील तरुणाई मोबाईल अतिवापर विळख्यात गुंतून गेलीय, अक्षर ओळख आणि सातत्याने हस्तलेखन ही व्यक्तिमत्व विकास करणारी वास्तव सवय लयास जाऊ नये. यासाठी केवळ आभासी ईमोजीतून व्यक्त न होता वास्तवतेचे जगून लिहीत रहाअसे मूल्यविचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संयोजक जयंत देशपांडे यांनी तर आभार दिनेश जंगम यांनी आणि सूत्रसंचालन मुकुंद आफळे यांनी केले. या समारंभासाठी विद्यार्थी - विद्यार्थिनी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज - याइसेन पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** पर्यावरण जागृती व संवर्धन हे वैश्विक कार्य आहे. हे काम मर्यादित स्वरूपात न राहता हे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. सामाजिक बाधिलकीच्या दृष्टी कोनातून कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण कोयना पर्यावरण जागृती मोहीम राबवत आहे. त्यात पाटण तालुक्यातील सर्व शाळा व ज्युनिअर कॉलेज, सामाजिक संस्था यांनी या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरणाचे संवर्धन करूया. पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.म्हणून आपण सर्वांनी या पर्यावरण संवर्धन मोहिमेत सहभागी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटी पाटणचे संचालक याझसेन पाटणकर यांनी केले आहे. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, कोयना पर्यावरण जागृती मोहिमेचे मुख्य समन्वयक सुनीलराव पानस्कर, सतीश गायकवाड, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, पर्यावरण समन्वयक, शिक्षक, विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. याझसेन पाटणकर म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेपामुळे मोठी हानी झाली आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची व काही लोकांची जबाबदारी नाही तर ती प्रत्येक माणसाची, तुमची माझी जबाबदारी आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. तरच भविष्यात पुढची पिढी सुरक्षित व निरोगी जीवन जगू शकेल. मागील दोन वर्षापासून पर्यावरण जागृती मोहीमेच्या माध्यमातून कोयना एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळा कॉलेज मधून पर्यावरण संवर्धन जनजागृती करत आहोत. त्यात सीडबॉलची निर्मिती, विविध झाडे, वृक्षारोपण, प्लास्टिक मुक्त शाळा व गावे करणे, विद्यार्थांना निसर्ग परिचय करणे, निसर्ग पर्यावरण प्रदूषण याबाबत व्याख्याने, विविध निसर्ग दिवस सण साजरे करणे, जंगलांना व परिसरांना वणवे लागू नयेत. म्हणून विविध गावांमध्ये पथनाट्य व भित्तिपत्रक लावणे, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा निसर्ग ओळख कार्यशाळा असे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात येते. त्याच धर्तीवर याही वर्षी आपण कोयना पर्यावरण जागृती मोहीम राबविणार आहोत. त्यात तालुक्यातील सर्वच शाळांनी सह नागरिकांनी देखील यात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. प्रा.सतीश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले तर संजीव चव्हाण यांनी आभार मानले.

## युनियनच्या दणक्याने दिव्यातील रिक्षा चालक वठणीवर

### नियमानुसार प्रवासी वाहतूक सुरु

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील शिवशक्ती रिक्षा युनियनने रिक्षा मालक यांना केलेल्या आवाहणाला प्रतिसाद देत नियमानुसार रिक्षा रांगेत उभ्या करून प्रवासी वाहतूक सुरु झाली आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीतून दिवेकरांना दिलासा मिळताना दिसत आहे. दिवा स्टेशन परिसरात प्रवाशांना प्रवास करताना वाहतूक कोंडीचा दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. नेमका हाच मूलभूत प्रश्न आज शिवशक्ती युनियनने सोडवला आहे. यापुढे दिवा स्टेशन भागात रिक्षा चालक हे नियमानुसारच प्रवासी वाहतूक करतील असे युनियनचे अध्यक्ष विनोद भगत यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.यापुढे रिक्षा चालकांचा बेशिस्तपणा अजिबात सहन केला जाणार नाही. तसेच नियम मोडणाऱ्या चालकांवर तात्काळ कडक कारवाई केली जाणार असुन युनियनने दिलेल्या माहितीनुसार गेल्या काही महिन्यात हजाराहून अधिक बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईमुळे बेशिस्त रिक्षा चालकांना वचक बसणार आहे, आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची खात्री देखील मिळणार आहे.प्रवाशांच्या होणाऱ्या वारंवार तक्रारींची शिवशक्ती रिक्षा युनियनने वेळीच दखल घेतलेली असुन तशी वाहतूक विभागास देखील कल्पना दिली आहे. दिव्यातील प्रवाशांनी देखील सुरक्षित आणि सुरळीत रिक्षा प्रवासासाठी युनियनल तथा रिक्षा चालकांना वेळोवेळी सहकार्य करुन नियमानुसार रिक्षा रांगेतच पकडाव्यात असे आवाहन युनियनचे प्रवीण बार्शीकर यांनी केले आहे.



## रा.जि.प शाळा चिरनेर येथे गुणगौरव, साऊंड सिस्टिम लोकार्पण सोहळा संपन्न



**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.२२, उरण (रायगड) :** रा.जि.प शाळा चिरनेर येथील सरस्वती कलामंच येथे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे दर्शन घडवणारा, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या तसेच बी.टी.एस आणि मंथन परीक्षेत तालुक्याच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावलेल्या व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. याच कार्यक्रमात कै.रघुनाथ फोफेरकर यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव प्रसाद फोफेरकर यांच्या वतीने शाळेला साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली. कार्यक्रमाच्या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद आवर्जुन उपस्थित होते. सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तसेच बीटीएस आणि मंथन परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत येऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. या प्रसंगी मधुकर फोफेरकर यांनी शाळेसाठी दिलेल्या या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बळीराम पाटील यांनी उपस्थितीसाठी सर्व मान्यवर, पालक आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळाले असून लोकसहभागातून शाळेच्या विकासाला हातभार लागला आहे.